# श्रीगुरुमाईंच्या वचनांवर ध्यान

## ईशा सरदेसाई यांच्याद्वारे लिखित

### कलियुग, साधनेचा समय

श्रीगुरुमाईंनी सत्संगादरम्यान युगांविषयी जे सांगतले, ते ऐकून मी भारावून गेले. भारताच्या शास्त्रग्रंथांनुसार, सध्या आपण कलियुगात राहत आहोत. श्रीगुरुमाईंनी सांगितले की, कलियुगाबद्दल लोक साधारणपणे भीतीने आणि धास्तीने बोलतात; कलियुगाला ते अराजकता आणि विध्वंस यांच्या समान समजतात.

गोष्ट अशी आहे की, चांगुलपणा आणि विनाश, सर्वच युगांमध्ये घडले आहेत. भारतीय शास्त्रग्रंथांचे आणि कथांचे अगदी वरवरचे वाचन जरी केले, तरी एवढे तर सहजच स्पष्ट होईल. तरीदेखील काही कारणास्तव, असे मानले जाते की, कलियुगात दुष्टपणाचा प्रभाव हा पूर्वीच्या युगांच्या तुलनेत अधिक आहे.

त्यामुळे श्रीगुरुमाईंनी जेव्हा हे सांगितले की, भारताचे संतजन कलियुगाविषयी निर्भय होते, तेव्हा मला ते खरोखर खूपच आवडले. ते संतजन भीतीने घाबरून गेले नाहीत. याऊलट, त्यांनी या युगाकडे एक सुसंधी म्हणून पाहिले. त्यांनी सर्वांना साधना करण्यासाठी, भगवंताचे नाम गाण्यासाठी प्रेरित केले, हे समजून घेण्यासाठी प्रेरित केले की, भगवंताच्या नामाचे एकदा केलेले उच्चारणदेखील आत्मज्ञान प्राप्त करवून देऊ शकते. त्यांच्या दृष्टीने, खरे संकट तर भगवंताच्या नामाचे विस्मरण होणे हेच आहे. जसे संतकवी नामदेव महाराज त्यांच्या एका अभंगात म्हणतात : “अमृताहूनी गोड नाम तुझे देवा। मन माझे केशवा का बा न घे॥”—“हे भगवंता तुझे नाम अमृताहून गोड आहे. पण हे केशवा, मग माझे मन त्याचा जप का बरे करत नाही?”

निश्चितच, साधना ही चांगल्या आणि वाईट या दोन्ही काळात करता येते आणि करायलाही हवी. याने काही फरक पडत नाही की, सूर्याचा प्रकाश आपल्याला दिसतो आहे की, तो दृष्टिआड झाला आहे. पण माझ्या लक्षात असे आले आहे—आणि कदाचित तुमच्यादेखील लक्षात आले असेल—की, जेव्हा परिस्थिती काही प्रमाणात प्रतिकूल होतात, तेव्हा आपल्याला साधना करण्याची अधिक प्रेरणा मिळते. चांगला काळ सुरू असतो, तेव्हा ‘आपल्या प्रयत्नात शिथिल होणे’, आपले अभ्यास उद्यापर्यंत,

परवापर्यंत किंवा त्याच्याही पुढच्या दिवसापर्यंत टाळणे सोपे असते आणि हे सर्व करत असताना आपण स्वतःला एखाद्या खोट्या [किंवा किमान तात्पुरत्या] सुरक्षिततेच्या भावनेत लपेटून घेतो, जी अशा गोष्टींवर आधारलेली असते, ज्या गोष्टी आपण आपल्या बाहेर पाहू शकतो, ऐकू शकतो व अनुभवू शकतो.

पण जेव्हा ही पायाभूत तत्त्वे डळमळीत होत असल्याचे भासू लागते, जेव्हा कोसळण्याचा धोका अचानकपणे अशा प्रकारे स्पष्टतः जाणवू लागतो, जसा तो कदाचित एका वर्षापूर्वी वा दहा वर्षांपूर्वी जाणवला नसेल, तेव्हा स्वभाविकपणे आपण ते शोधतो, जे नेहमी स्थिर राहील. आपल्या चहूबाजूला स्थित असलेल्या भवसागरात कितीही उलथापालथ झाली, तो कितीही खवळलेला असला, तरी असे स्थान कुठे आहे, जिथे आपण सदैव शरणागत होऊ शकतो? ते स्थान आपल्या अंतरीच आहे, ते धाम जिथे पोहोचण्यासाठी श्रीगुरू आपल्याला मार्गदर्शन करतात—आणि जिथे आपण केवळ परिश्रमपूर्वक केलेल्या आपल्या साधनेद्वारेच पोहोचू शकतो.

आता मी तुम्हाला विचारते : हे सत्य नाही का?

© २०२६ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.